# प्रबळगड संवर्धन आदिवासी सामाजिक विकास संस्था

वन, किल्ले संवर्धन व इको-पर्यटन माध्यमातून आदिवासी गावाच्या विकासाचा ध्यास.

नोंदणी क्रमांक. महाराष्ट्र-४३६/२०१३/रायगड (संस्था नोंदणी अधिनियम १८६०, अन्वये नोंदणी)


जावक क्र.-१ दिनांक : ०१/०१/२०१४

**प्रति,**

**ग्रामपंचायत वारदोली,**

**ता-पनवेल जि- रायगड- ४१०२०६**

**विषय:-गाव माची प्रबळ हद्दीत येणाऱ्या प्रबळगड, कलावंतीण दुर्ग या इतिहास कालीन ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटका कडून पार्किंग शुल्क, कॅमेरा शुल्क, प्रवेश शुल्क, आकारणी लागू करण्याबाबत ना हारकत दाखला (N.O.C) मिळण्याबाबत. तसेच ग्रामपंचायत माहिती रजिस्टर मध्ये संस्थेचे नाव नोंदणी करण्याबाबत.**

**अर्जदार:- ग्रामस्थ माचीप्रबळ, च्या वतीने प्रबळगड संवर्धन आदिवासी सामाजिक विकास संस्था, माची प्रबळ,पो- चिखले, तालूका- पनवेल जिल्हा- रायगड.**

आम्ही ग्रामस्थ माचीप्रबळ, प्रबळगड संवर्धन आदिवासी सामाजिक विकास संस्थेच्या वतीने अर्ज करू इच्छितो की, आम्ही माची प्रबळ ग्रामस्थ एकत्र येऊन दिनांक १८/११/२०१३ रोजी प्रबळगड संवर्धन आदिवासी सामाजिक विकास संस्था. (N.G.O.) नोंदणी करून घेतली आहे. हि संस्था, संस्था अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये मा. धर्मादाय आयुक्त अलिबाग (Charity Commissioner) येथे योग्यरीत्या नोंदणी झालेली आहे. वरील संस्था खालील हेतूनुसार नोंदणीकृत करून घेण्यात आली आहे.

१.प्रबळगड, कलावंतीणदुर्ग हे इतिहासकालीन गडाचे संवर्धन करणे.

२. प्रबळगड आजू बाजूचे वनक्षेत्र यांचे संवर्धन करणे व पर्यावरण जोपासणे .

३. प्रबळगड पर्यटन विकास वाढीसाठी विविध योजना (उपक्रम) राबविणे.

४. माची प्रबळ स्थानिक आदिवासी लोकांचा सर्वांगीण विकास साधणे.

वरील हेतु नुसार आम्ही आमच्या गावाच्या हद्दीत येणाऱ्या प्रबळगड, कलावंतीण दुर्ग या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटका कडून पार्किंग शुल्क, कॅमेरा शुल्क, प्रवेश शुल्क, आकारणी लागू करण्याबाबत माची प्रबळ ग्रामस्थांकडून निर्णय घेण्यात आला आहे. सदर शुल्काचा उपयोग प्रबळगड संवर्धन आदिवासी विकास संस्था, मु- माची प्रबल, पो चिखले, पोस्ट- चिखले, ता- पनवेल, जि-रायगड या स्थानिक आदिवासी संस्थेच्या व्यवस्थापन या माध्यमातून प्रबळगड, कलावंतीण दुर्ग, व आजूबाजूचे वनक्षेत्र यांचे संवर्धन करणे तसेच प्रबळगड पर्यटन विकास वाढीसाठी योजना (उपक्रम) राबविणे व त्यातून प्रबळ माची गावातील स्थानिक आदिवासी लोकांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी करण्याचे ठरवले आहे. तरी सदर अर्जानुसार आपल्या ग्रामपंच्यात कडून गाव माची प्रबळ हद्दीत येणाऱ्या प्रबळगड, कलावंतीण दुर्ग या इतिहास कालीन ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटका कडून पार्किंग शुल्क, कॅमेरा शुल्क, प्रवेश शुल्क, आकारणी लागू करण्यासंदर्भातला ना हारकत दाखला (N.O.C) मिळावी, तसेच ग्रामपंचायत माहिती रजिस्टर मध्ये संस्थेचे नाव नोंद करावी हि नम्र विनंती.

**वरील संदर्भानुसार खालील प्रमाणे कागदपत्रे जोडलेली आहेत.**

**१. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र**

**२. संस्थेच्या लेटर हेडवर संस्थेचे विधानपत्राची नकल.**

३. **प्राथमिक सभा कामकाज वृत्तांत नुसार गाव- माचीप्रबळ ग्रामस्थांनी मंजूर केलेला ठराव.**

| | | |
|---|---|---|
| श्री.निलेश (भाऊ) भुतांबरा | श्री.नामदेव कमळू भुतांबरा | श्री.अनंता गणू शिंद |
| संस्थापक व अध्यक्ष | उपध्यक्ष | सचिव |


कार्यालय पत्ता: मु. वारदोली ठाकूरवाडी, पोस्ट– चिखले, ता– पनवेल, जि– रायगड, पिन कोड–४१०२०६, महाराष्ट्र, (भारत)

वेबसाइट: www.prabalgad.com दूरध्वनी: +91-8056186321 +91-9870943281 +91-9290461474 ईमेल: prabalgadadivasi@gmail.com